## प्रकरण दुसरे

# नामदेव चं. कांबळे चरित्र व वाङ्मय

# प्रकरण दुसरे
# नामदेव चं. कांबळे चरित्र व वाड्मय

**प्रास्ताविक :-**

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला नामदेव कांबळे यांचे जीवनचरित्र व वाङ्मयलेखनाचा स्थूलमानाने परिचय करुन घ्यावयाचा आहे. लेखकाच्या साहित्यकृतींचा अभ्यास करीत असताना, त्याच्या लौकिक जीवनाचा वेध घेणे हा ही एक अभ्यासाचा विषय ठरतो. त्याने जीवनात घेतलेल्या जीवनानुभवाचे नाते थेट त्याच्या वाङ्मयाशी कधी कधी जोडले जाते. वाङ्मयातून त्याच्या जीवनसंस्कारांचे साद पडसाद उमटत असतात आपल्या मनातील विचारांना तो साहित्यकृतीच्या माध्यमातून प्रगट करीत असतो. नामदेव कांबळेंच्या जीवनचरित्र लौकिक जीवनासंबंधी विचार करीत असताना, त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण, जीवनसंस्कार, व्यवसाय, लेखन व स्वभाव आदींचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. त्याचबरोबर त्यांना मिळालेले विविध पुरस्कार, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, साहित्यविषयक दृष्टिकोन यासंबंधी विचार करणे उचित ठरेल.

**नामदेव कांबळे यांचे जीवनचरित्र :-**

विदर्भातील वाशिम जिल्हयास प्राचीन व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. प्राचीन काळातील वत्स्यगुल्म नगरी म्हणजेच आजचे वाशिम शहर होय. साहित्यिक परंपरा असलेल्या या जिल्ह्यात रहस्य कथाकार द. वि. सोमण, गूढ कथाकार दिवाकर नेमाडे, सुप्रसिध्द नाट्यलेखक महेश एलकुंचवार, विनोदी लेखन अशोक मानकर, बाबाराव मुसळे, अशा साहित्यकांबरोबर साहित्य अकादमी पुरस्कृत कादंबरीकार नामदेव कांबळे यांचा जन्म शिरपूर जैन (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे १ जानेवारी १९४८ मध्ये मातंग कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चंद्रभान आणि आईचे नाव भुलाबाई. त्यांच्या कुटुंबात चार भाऊ, तीन बहिणी, आई, वडील, आजी अशी दहा अकरा माणसे रहात असत. घरात आई वडील अडाणी असले तरी आपल्या मुलांना त्यांनी थोडेफार शिकविले. त्यांचा मोठा भाऊ आठवी शिकला होता. नामदेव कांबळे यांचे प्राथमिक शिक्षण व त्यानंतर माध्यमिक शिक्षणही त्यांच्या गावी शिरपूरमध्ये झाले. मॅट्रिकची परीक्षा १९६७ मध्ये ते पास झाले त्याकाही अकरावी बारावी नसल्याने विज्ञान शाखेत त्यांनी बी.एस्सी. भाग - १

ला प्रवेश घेतला. बी.एस्सी भाग १ पास झाल्यावर त्यांच्या मनात डॉक्टर होण्याचा विचार आला. त्यांनी एम.बी.बी.एस. करण्याचे ठरविले. डॉ. आंबेडकर गव्हर्मेंट कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर येथे १९६९ मध्ये प्रवेश घेतला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन त्यांना एम.बी.बी.एस.ला प्रवेश मिळाला होता. मात्र परिस्थितीमुळे शिक्षण न झेपल्यामुळे एम.बी.बी.एस.च्या भाग - १ परीक्षेतील अपयशामुळे त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती बंद झाली. परिणामी त्यांचे शिक्षण थांबले. व तेथून ते परत गावी आले. परत आल्यानंतर काही दिवस बेकारीत गेले. आयुष्यात काहीतरी चांगले बनण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. या काळात काव्याची आवड निर्माण झाली व कवितेने त्यांना आधार दिला.

एम.बी.बी.एस.चे शिक्षण सोडून गावी परतल्यावर ते वाशीमच्या कन्याशाळेत चौकीदार म्हणून काम करु लागले. प्रमोशननंतर प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून काम पाहू लागले. पुढे त्यांनी १९७७ मध्ये बी.ए. केले. पुढे अकोला या ठिकाणी बी.एड्. केले. त्यानंतर १९७९ मध्ये नोकरीस लागले. सध्या ते वाशीम येथे राणी लक्ष्मीबाई कन्याशाळा येथे माध्यमिक शिक्षक म्हणून काम करतात त्यांचा विवाह आशाताई यांच्याशी १ जून १९७१ मध्ये झाला. दिपक, दिनेश आणि गणेश अशी तीन मुले त्यांना आहेत. शिरपूर या गावी नामदेव कांबळेंच्या बालपणाला आकार प्राप्त झाला.

**जीवनसंस्कार :-**

नामदेव चं. कांबळे यांचा जन्म दलित समाजात झाल्याने आणि त्यांचे कुटुंब अशिक्षित असल्याने एखाद्या मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबाप्रमाणे त्यांच्यावर जाणीवपूर्वक जीवनसंस्कार झाले नाहीत. मात्र पुढील काळातील त्यांच्यामध्ये निर्माण झालेली साहित्याची आवड व त्यातून साहित्याचे वाचन यातून त्यांचे जीवन संस्कारमय झाले आहे.

शिक्षणामुळे, वाचनामुळे, जीवनात भेटलेल्या चांगल्या व्यक्तिंच्या सहवासामुळे त्यांच्यावर चांगले जीवनसंस्कार होऊ शकले. संस्कारक्षम वयात नसेल परंतु पुढील काळात त्यांना चांगला मित्र परिवार लाभला. मनुष्याच्या आयुष्यात संगत फार महत्वाची असते. त्यातूनच त्यांची जडणघडण होत असते. नामदेव कांबळेंच्यावर झालेले उत्तम संस्कारच त्यांच्या आयुष्याला वळण देऊ शकले.

**नामदेव कांबळेंना मिळालेले विविध पुरस्कार :-**

लेखकाच्या साहित्यकृतींना मिळालेले पुरस्कार हे साहित्यकृतींचे श्रेष्ठत्व स्पष्ट करीत असतात. त्याचबरोबर लेखकाचे मोठेपणही त्यातून सिध्द होत असते. नामदेव कांबळेंच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचा विचार करुन त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

| क्रं. | पुरस्कार | पुरस्काराचे वितरण | वर्ष |
|---|---|---|---|
| १) | डॉ आंबेडकर फेलोशिप | भारतीय दलित साहित्य | २४ सप्टें. १९९४ |
| २) | बा. सी. मर्ढेकर पुरस्कार (राघववेळ) | गोमंतक साहित्य सेवक मंडळ | १९९४ |
| ३) | मराठी वाङ्मय निर्मिती पुरस्कार (राघववेळ) | महाराष्ट्र शासन | १९९३-९४ |
| ४) | कै. ग. त्र्यं. माडखोलकर स्तृती वाङ्मय पुरस्कार (राघववेळ) | विदर्भ साहित्य संघ | १४ जाने. १९९५ |
| ५) | ह ना आपटे पारितोषिक (राघववेळ) | मराठी साहित्य परिषद | २७ मे १९९४ |
| ६) | साहित्य अकादमी पुरस्कार (राघववेळ) | - | १९९५ |
| ७) | संजीवन ग्रंथोत्तेजक पुरस्कार (मोराचे पाय) | कै. गोविंदराव पाटील सावंत गोरठेकर स्मृति प्रीत्यर्थ | १९९६-९७ |
| ८) | समरसता पुरस्कार | सामाजिक समरसता मंच महाराष्ट्र | १९९७ |
| ९) | सामाजिक ऐक्य पुरस्कार | रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी | ८ मार्च १९९७ |
| १०) | मराठी वाङ्मयनिर्मिती पुरस्कार | महाराष्ट्र शासन | १९९७-९८ |
| ११) | १९९९ मधील उत्कृष्ट गद्य साहित्यकृती (साजरंग) | सुवर्ण महोत्सवी साहित्य संमेलन ट्रस्ट, इचलकरंजी आणि आपटे वाचन मंदिर इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने. | १९९९ |

**नामदेव चं. कांबळे यांचे काव्यलेखन :-**

नामदेव कांबळे यांचा कादंबरीकार म्हणून लौकिक असला तरी ते कवी मनाचे साहित्यिक आहेत. नामदेव कांबळे यांचे प्रथम 'काव्य' या साहित्यप्रकाराशी नाते जडले. त्यांना 'काव्य' हा साहित्यप्रकार मनापासून आवडतो. त्यांनी १९७१ च्या आसपास काव्यलेखनाला सुरुवात केली. मधुकर केचे, वामन इंगळे, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, सुधाकर गायधनी, विठ्ठल वाघ, लोकनाथ यशवंत, अनिल कांबळे, सदानंद देशमुख आदी नामदेव कांबळे यांचे समकालीन कवी आहेत.

त्यांचे आवडते कवी - मंगेश पाडगावकर, कुसुमाग्रज, कविवर्य बोरकर, नारायण सुर्वे, हे तर अलिकडच्या पिढीतील सुधीर मोघे, नारायण कुलकर्णी, कवठेकर, विठ्ठल वाघ, लोकनाथ यशवंत, उत्तम कोळगावकर हे कवी आहेत.

नामदेव कांबळे यांचा १९८९ मध्ये 'अकल्पित' कवितासंग्रह प्रसिध्द झाला. त्यांच्या काव्यलेखनाला म. मा. केळकर यांनी मदत केली. 'अकल्पित' या काव्यसंग्रहातील कविता या 'आदिम', 'लोकमत', 'युगवाणी', 'बहुमत', 'सुगावा', 'बळीराजा', 'वाङ्मयशोभा', 'शोभायात्रा', 'शब्दांगण', 'अस्मितादर्श' आणि नागपूर आकाशवाणीवरुन पूर्व प्रसिध्द झाल्या आहेत. या काव्य संग्रहाच्या प्रकाशनाकरीता महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान लाभले आहे.

श्री. कांबळे यांच्या 'प्रत्यय' हा दुसरा काव्यसंग्रह १९९७ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला. 'प्रत्यय' मधील काही कविता या 'अक्षरवैदर्भी' मधून प्रसिध्द झाल्या आहेत. या संग्रहात निवडक ६१ कविता प्रकाशित केल्या आहेत.

त्यांचा तिसरा काव्यसंग्रह 'तो : ती : अन्वयार्थ' हा १९९९ मध्ये देशमुख आणि कंपनीनेच प्रकाशित केला. या काव्यसंग्रहातील कविता या शीर्षक विरहीत अशा आहेत. एकूण ६५ काव्यांचा अंतर्भाव यामध्ये झाला आहे.

कवितेच्या निर्मितीविषयी नामदेव कांबळे लिहितात, ''कवितेची निर्मिती प्रक्रिया काही अंशी मानसिक आहे. काही अंशी जैविकही आहे. कविता प्रकाशासारखी असते. कवितेचे बीज मनात पडते ते

अनुभूती म्हणून. एखादा प्रसंग घडतो. अनुभव येतो. तो कविचा असेल. इतरांचाही असेल. त्याने कवी उल्लासित होतो, रोमांचित होतो अगर अस्वस्थ होतो उल्लासित, रोमांचित अगर अस्वस्थ करणारे कारण कविमनात प्रकाशासारखे शिरते.''[१]

त्यांच्या कवितेतून वाचकाला संवेदनशीलता जाणवून राहते. नामदेव चं. कांबळे कवी म्हणून भावूक व अंतर्मुख होऊन समाजजीवनाचा विचार करतात. कवितेतून भूक, भिती, विश्रांती, स्वसंरक्षण, आक्रमण या मानवाच्या आणि प्राण्यांच्या ज्या बाबी आहेत, त्याचा विचार कवी करताना दिसतो. माणूस आणि त्याच्या समस्या, प्रश्न यांनी कविच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. माणसाच्या स्वार्थी भावनेचे चित्रण, आध्यात्मिक प्रेरणा, संस्कृतीचे संचित, समाजमनातील सामाजिक, राजकीय प्रश्न, समस्या यांचा विचार करत असताना कवीने चिंतनशीलता प्रकट केली आहे.

**नामदेव कांबळे यांचे कथालेखन :-**

नामदेव चं. कांबळे यांचे काव्यलेखन सुरु असतानाच त्यांना कथालेखन करावेसे वाटले आणि १९८५ मध्ये त्यांनी पहिली कथा लिहिली. ती 'वाङ्मयशोभा' तून प्रसिध्द झाली. त्यांना आपण कथालेखन करु शकतो असा आत्मविश्वास वाटू लागला आणि त्यानंतर 'अनुष्टुभ'च्या कथास्पर्धेत पाठविलेल्या 'मातीचे धन' या कथेला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आणि त्यानंतर त्यांनी कवितेबरोबर कथालेखनही सुरु केले. त्यांच्या कथा 'अनुष्टुभ', 'रसिक', 'सकाळ' 'अक्षर वैदर्भी', 'वाङ्मयशोभा', 'मुंबई तरुण भारत', आदीमधून पूर्वप्रसिध्द झाल्या आहेत.

'परतीबंद' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९९४ मध्ये मेहता प्रकाशनने प्रकाशित केला या कथासंग्रहात एकुण १० कथांचा समावेश आहे. सुरुवातीच्या काळातील त्यांची कथा प्राथमिक वाटत असली तरी मानवी स्वभावाच्या विविध स्वभाव वैशिष्ट्यांवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. याबाबत त्यांच्या 'परतीबंद' कथासंग्रहातील 'परवड', 'दंगल', 'विहिर', 'मातीचे धन', 'भोग', 'अगतिक', 'वाटब, 'परतीबंद' आदी कथांचा विचार करता येईल. भूकेचा प्रश्न, शासकीय कर्मचाऱ्यांचा लाचखाऊपणा, संन्याशाची भोगलोलूप वृत्ती, प्रौढकुमारीचे दु:ख, आंतरजातीय विवाह आदी विषय नामदेव कांबळेंनी आपल्या कथामधून हाताळले आहेत. मध्यंतरीच्या काळात ते कादंबरीलेखनाकडे वळल्याने कथालेखनाकडे त्याचे दुर्लक्ष झाल्याचे जाणवते.

**नामदेव कांबळे यांच्या एकांकिका :-**

कविता, कथा, कादंबरी, लेख आदी वाङ्मयप्रकारांमधून लेखन करणाऱ्या नामदेव कांबळेंनी काही एकांकिका लिहिल्या आहेत. त्यांनी नाटक या वाङ्मयप्रकारातून लेखन केले नसले तरी नाटकाला जवळ जाणारा 'एकांकिका' हा नाट्यप्रकार त्यांनी हाताळला आहे. त्यांचे एकांकिका लेखन 'अक्षरवैदर्भी' या नियतकालिकांमधून प्रकाशित झाले आहे. १९८६ मध्ये त्यांनी एकांकिता लिहिल्या. त्यांची 'चाहूल' ही एकांकिता 'अक्षर-वैदर्भी' एप्रिल-मे १९९७ च्या वर्धान विशेषांकामध्ये आली होती. या एकांकिकेला अक्षर वैदर्भी दिवाही २६ साहित्य स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. नामदेव कांबळे यांच्या 'चाहूल' आणि 'अंधार' या दोन्ही एकांकिकेमधून 'बेकारी'चा अनुभव त्याच्या परिणामासह प्रकट झाला आहे.

**नामदेव चं. कांबळे यांचे कादंबरीलेखन :-**

कविता, कथा, ललितलेख असे लेखन करीत असताना आपल्या हातून मोठे असे काही लिहून होत नाही याची नामदेव कांबळे यांना खंत वाटू लागली आणि त्यातून ते कादंबरी लेखनाकडे वळलेले दिसतात. कथेचा आकृतीबंध त्यांना मर्यादित वाटू लागताच कादंबरी त्यांना आकर्षित करु लागलेली दिसते. १९८९-९० च्या सुमारास त्यांनी कादंबरीलेखनाला सुरुवात केली. नामदेव कांबळे यांनी एकुण सात कादंबऱ्या लिहिल्या आहेत. या साहित्यकृतींनी दलित कादंबरीमध्ये मोलाची भर टाकली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**१) अस्पर्श :-**

'अस्पर्श' या कादंबरीने नामदेव कांबळे यांनी कादंबरी लेखनाला सुरुवात केली. ही कादंबरी 'प्रितमसिंग जुनेजा', बुधवार पेठ, पुणे यांनी १९९० मध्ये प्रकाशीत केली. या कादंबरीने 'नारायण नत्थू तायडे' या मातंत समातील शिक्षकावर प्रकाश टाकला आहे त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रात शिक्षकाशी असणारे हेवेदावे, त्याच्यावर जातीयतेच्या राजकीय तणावामुळे होणारा अन्याय, त्याची होणारी गळचेपी अचूक आणि मार्मिक शब्दात कादंबरीकाराने चित्रित केली आहे.

सवर्णाची मुलगी मागासवर्गीय मुलाने पळवून आणल्यानंतर नारायण आणि उमा या मातंग समाजातील दांपत्याने तिला दिलेला आश्रय आणि त्यामुळे गावात, समाजात निर्माण झालेला तणाव हा या कादंबरीचा विषय आहे. 'माणुसकी धर्म', मानणाऱ्याची समाजाकडून होणारी उपेक्षा 'अस्पर्श' मध्ये मांडण्याचा कादंबरीकाराने प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या कादंबरीतील घटना व पात्रे काल्पनिक आहेत असे सुरुवातीलाच प्रकाशकांनी स्पष्ट केले आहे. वैदर्भी भाषा यामध्ये संवाद रुपाने येते.

**२) 'मोराचे पाय' :-**

'मोराचे पाय' ही कादंबरी १९९७ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली. या कादंबरीमधून नामदेव कांबळे यांनी एका नव्या विषयाला शब्दरुप दिले आहे. भूक जीवमात्रांची आदिप्रेरणा आहे. मग ती पोटाची असो, शरीराची असो, मनाची असो. कुठलीच भूक तशी कायम उपेक्षित ठेवता येत नाही. त्यातून शारीरिक भूक सगळ्या भूकांवर मात करीत असते. या विचारातून 'मोराचे पाय' या कादंबरीचे लेखन झाले आहे. मानवी वासना शब्दांत बांधताना, 'भूमिके'त नामदेव कांबळे लिहितात, ''वासनेसोबत वाहवत जाणे मला, माझ्या लेखणीला भावणारे नसल्याने वासनेला शब्दांत बांधण्याचे मी आव्हान पत्करले. तिला उघडे करतानाही ती शब्द प्रावरणात कमीत कमी कशी उघडी दाखविता येईल, याचा मी कसोशीने प्रयत्न केला. शारीरिक भुकेसारखा विषय शक्य त्या सगळ्या मर्यादा पाळून वास्तवतेच्या जवळ नेण्याचा प्रयत्न केला.''[२]

मातृत्वासाठी एका स्त्रीची होणारी तडफड यातून निर्माण झालेले विवाहबाह्य संबंध असे या कादंबरीचे कथानक असले तरी तो विवाहबाह्य संबंध दोन पुरुषांच्या समलिंगी संबंधातून निर्माण होतो हा विषय कादंबरीकाराने विशिष्ट मर्यादा पाळून हाताळला आहे. यामधील वासना चित्रित करणारे कोणतेच घटना-प्रसंग कादंबरीकाराने भडक रंगात रंगविले नाहीत. 'मोराचे पाय' मध्ये कृषीवल भूमी, नागवेल, शेवरी, हादगा, टिटवी, मोर, लांडोर ही प्रतिके आली आहेत.

**३) 'राघववेळ ते सांजरंग' -**

'राघववेळ' (१९९३), 'उनसावली' (१९९७), 'सांजरंग' (१९९९) या कांबळे यांच्या तीन कादंबऱ्या देशमुख आणि कंपनीने प्रकाशित केल्या आहेत.

नामदेव कांबळेंनी 'राघववेळ' ते सांजरंग या कादंबऱ्यांचे हस्तलिखित १९९० मध्ये लिहायला घेतले. दलित जीवन जगणाऱ्या मांतग कुटुंबातील वालंबी-रघूची जीवनकहाणी या कादंबऱ्यांतून मांडली आहे. कथानक हे या तीन कादंबऱ्यातून सलगपणे मांडले आहे. त्यापैकी 'राघववेळ' या कादंबरीला इ. स.१९९५ वर्षासाठीचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यानंतरच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यांचा सविस्तर विचार पुढील प्रकरणामध्ये करणार आहोत.

**४) 'शेल झाडा' –**

'शेल झाडा' ही नामदेव कांबळेंची कादंबरी देशमुख आणि कंपनीने प्रकाशित केली आहे. या कादंबरीला ज्येष्ठ विचारवंत व लेखक आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ स ह देशपांडे यांची प्रस्तावना लाभली आहे. ही कादंबरी बलुतेदारी पध्दतीवर आधारीत आहे. कुटुंबकथेबरोबर गाव, त्याचा परिसर, त्यांची बोली, त्यांच्या समस्या कादंबरीत येतात. या कादंबरीमध्ये तीन पातळ्यावर कथानक विकसित होते. आणि नवीन पिढीच्या भवितव्याचे काय ? ही समस्या घेऊन ती प्रगटते. सुधारणेचा परिणाम केवळ एका बलुतेदारापुरता सीमित राहत नाही. अन्य बलुतेदारांवरही त्या सुधारणेचा परिणाम होत असतो. म्हणून ही कथा गऊ आणि सुपा या व्यक्तिरेखांपुरती मर्यादित न राहता गावात असणाऱ्या न्हावी, सुतार, कुंभार आदि बलुतेदारांना सामावून घेते. या कादंबरीत वैदर्भीय बोलीचा वापर संवादासाठी केला गेला आहे.

'शेलझाडा' या शब्दाचा अर्थ प्रमाणभाषेत 'उलगणे' होते तर वैदर्भीय भाषेत 'उलंगवाडी' असा होतो. पिकांचा हंगाम संपल्यानंतरची अवस्था म्हणजे 'उलंगवाडी' होय. गऊ आणि सुपा यांच्याबरोबरच सुधारणेमुळे बलुतेदाराचा होणारा 'शेलझाडा' कादंबरीला अपेक्षित आहे.

**नामदेव कांबळे यांचे ललित लेखन :-**

**'स्मरण विस्मरण'**

'स्मरण-विस्मरण' हा नामदेव कांबळेंचा लेखसंग्रह जानेवारी २००० मध्ये प्रकाशित झाला आहे. एप्रिल १९९७ मध्ये दैनिक तरुण भारतच्या कार्यकारी संपादकाचे तरुण भारत मधून साप्ताहिक सदर चालविण्यासाठी श्री. कांबळे यांना पत्र आल्यानंतर ते आव्हान त्यांनी स्विकारले आणि तरुण भारतच्या रविवार पुरवणीत १२ मे १९९६ ते ११ मे १९९७ या काळात वर्षभर 'तळातल्या सावल्या' मधून लेखन

केले. निवडक वैचारिक लेख, आणि जीवनातील अविस्मरणीय आठवणी हाच 'स्मरण-विस्मरण' लेखसंग्रहाचा विषय आहे. या लेखसंग्रहात एकूण ४४ लेख आहेत. या लेखसंग्रहाच्या मनोगतात म्हटल्याप्रमाणे वर्तमानपत्राला फारसे आयुष्य नसले तरी त्यातील वैचारिकता, जीवनाशी असलेले नाते लक्षात घेऊन सुनिल अनिल मेहता यांनी 'तळ्यातल्या सावल्या' सदरातील लेखांना 'स्मरण-विस्मरण' असे नाव देऊन पुस्तक रुपाने छापले. ते काव्यात्म आणि वाचनीय ठरले आहे.

या लेखसंग्रहातील काही लेखात कै. कविवर्य कुसुमाग्रह, रॉय किणीकर, मंगेश पाडगावकर, सुधीर मोघे, फ. मु. शिंदे, अरविंद भुजबळ, अनिल कांबळे, यांच्या कविता वापरुन काव्यात्मता प्राप्त करुन दिली आहे. 'स्मरण-विस्मरण' मध्ये माणूसपणाची भावना, समाज मनाचे प्रतिबिंब, पुरोगामी विचार, जगण्याच्या रीतीभाती, शेतकरी कष्टकरी समाजाचे चित्र ललित गद्याच्या रुपाने चिंतनाच्या पातळीवर व्यक्त झाले आहे.

सध्या नामदेव कांबळे यांनी एका नवीन कादंबरीलेखनाचा संकल्प केला आहे. वाशीमच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, ऐतिहासिक, पार्श्वभूमीवर त्याचे कादंबरीलेखन सुरु आहे त्यादृष्टीने त्यांना वाशीममधील ज्येष्ठ नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. वाशीमच्या १९२० ते १९९० या ७० वर्षांच्या कालखंडावर कादंबरीलेखन वाशीम परिसराचा एक संदर्भ ग्रंथ ठरेल.

**नामदेव कांबळे यांचे समीक्षालेखन :-**

मराठी साहित्यामध्ये लालित्याला महत्व देत नामदेव कांबळे यांनी काही प्रमाणात आस्वादक समीक्षेला जवळ जाणारे लेखन केले आहे. सप्टेंबर १९८७ मध्ये 'अक्षरवैदर्भी'च्या अंकात आस्वाद १ व आस्वाद २ मधून सुधाकर गायधनी, अनिल कांबळे यांच्या कवितांची समीक्षा केली आहे कवी गायधनी विषयी ते लिहितात, ''एका स्वतंत्र शैलीनी अभिव्यक्तीचा कवी जनमानसांच्या मनावर आपले वेगळे स्थान पटकावून आहे, त्यांचे स्फूट कवितालेखनही जबरदस्त असते. तसेच ते इथेही जाणवते.''[३]

तर अनिल कांबळेंच्या कवितेविषयी लिहिताना, ''नावावरुन दलित वाटणारे अनिल कांबळे, पण त्यांच्या कविता केवळ जाणीवेच्या असतात असे नाही. उघडं नागडं वास्तव मांडण्याची दलित साहित्याची धारणा त्यांच्या कवितेत आहेत. तर अंतर्मुख करुन शब्दाभोवती अर्थाची वलय निर्माण करणारी जीवनवादी धारणा ही त्यांच्या कवितेत आहे.''[४] यावरुन असे लक्षात येते की, नामदेव कांबळे जसे कवितेमागील दोष

दाखवतात, तसेच त्यांच्यामधील गुणवैशिष्ट्यांची चर्चा करतात.

नामदेव कांबळे यांनी 'हायकू' या काव्यरचनेविषयी काही विचार मांडले आहेत. ते लिहितात, ''हायकू एक सौंदर्य विधान असते. सहजगत्या बाहेर आलेला तो सौंदर्यादगार असतो. उत्कट अनुभवाने भरलेले असे निसर्गातल्या एखाद्या चुटपूट लावणाऱ्या घटनेचे, क्षणाचे शब्दरुप आकाराने एकदम लहान असते.''[५] तर हायकूच्या आशयासंदर्भात ते लिहितात, ''हायकूचा आशय त्यांच्या रचनाकारात अपूर्ण असतो. तो रसिकांच्या मनात पूर्ण होऊन काव्याचा सलग अनुभव म्हणून विकसित होतो.''[६]

दलित साहित्याच्या नव्या जाणीवा विषयी ते लिहितात, ''आजच्या दलित लेखकाची लेखणी आपल्याच जातीच्या कथा, व्यथा, वेदना मांडताना दिसते. त्यांनी इतरांच्या सुख-दु:खात सहभागी झाले पाहिजे. आजच्या दलित लेखकांनी भटक्या विमुक्तांच्या विश्वात संचार करायला हवा.''[७] असा रोखठोक सल्लाही ते दलित साहित्यिकांना देतात. या सर्व विवेचनावरुन त्यांच्यामधील समीक्षकाचा अल्प प्रमाणात का होईना परिचय होतो.

**जीवन विषयक दृष्टीकोन :-**

नामदेव कांबळे यांचा जीवनविषयक दृष्टिकोन व्यापक आहे. ते जीवनाकडे गांभीर्याने पाहताना दिसतात जीवनामध्ये प्रेमाची बाब मोलाची ठरते. याविषयी नामदेव कांबळे लिहितात, ''जीवनाचा हेतू काय? आपल्या अन इतरांच्या सुखासाठी धडपडणे असा सीमित जीवनाचा हेतू असेल तर त्याचा आत्मा प्रेमच ठरतो. उपजत, उपभोगात्मक आणि उदात्त असे तीन प्रकारचे प्रेम असते. आईवडिलांचे प्रेम उपजत असते. पती पत्नींचे उपभोगात्मक असते. समाज,देशावरचे प्रेम उदात्त असते. त्यागावाचून उदात्त प्रेम असत नाही.''[८]

जीवनाच्या क्षणभंगुरतेविषयी ते लिहितात, ''जीवन हे क्षणभंगुर आहे. ते अज्ञात शक्तीने आपल्याला बहाल केले आहे. आपल्या जीवनाचे नाटक रचणारी शक्ती कोणती ते आपल्याला ठाऊक नाही. कोणीतरी त्याचे गीत लिहिले आहे. संवाद बसविले आहे. या नाटकाचे आपण नट आहोत. नट नाटक अर्ध्यावर टाकून जातो. तरीही पडदा पडत नाही तो गेला म्हणून नाटकाला फरक पडत नाही. ते चालूच असते. कारण हे नाटक कोणा एकाचे नसते. अखिल मानवाचे असते.''[९] सामान्य माणसाच्या जीवन

जगण्याविषयी नामदेव कांबळे लिहितात, ''माणसाच्या जीवनाची शाश्वती नसते. त्यातल्या त्यात सामान्य माणसांचे जीवन सर्वाधिक अशाश्वत असते. जीवन अशाश्वत असले म्हणून जगणे टाळता येत नाही. जगण्याचा शाश्वत असा व्यापार त्याला करावाच लागतो. जग मिथ्या असले तरीही वाट्याला आलेला संसार रेटावाच लागतो.''[१०] वरील संदर्भावरुन नामदेव कांबळेंच्या जीवनविषयक दृष्टिकोनाची कल्पना येते.

**साहित्यविषयक दृष्टिकोन :-**

नामदेव कांबळेंच्या मते जनवादी साहित्य, समरसता साहित्य, बहुजनवादी साहित्य या संकल्पना एकच आहेत. माणसाने जात विसरुन एकमेकांशी समरस व्हायला पाहिजे. तरच माणसांची दु:खे कमी होतील. समरसतेची संकल्पना व्यापक मानवजातीला धरुन पुढे येणारी संकल्पना आहे या संकल्पनेला वास्तविक विरोध करण्याचे कारण नाही कारण विरोध हा संकुचित आणि मर्यादित हेतूने आलेला असतो.

दलित साहित्यात येणारा पराकोटीला जाणारा नकार, विद्रोह परिवर्तन आणि विज्ञान निष्ठा या चर्तु·सूत्रीला त्यांचा विरोध नाही. मात्र सहानुभूतीने दलित लेखक आणि समीक्षकांनी पाहिले पाहिजे असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. दलित साहित्याविषयी ते म्हणतात, ''दलित साहित्य जर या चतु:सूत्रीच्या बाहेर पडलं तर दलित साहित्य वैश्विक पातळीपर्यंत सहजगत्या जाऊ शकते.''[११] अशा प्रकारे आपणाला त्यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन संक्षिप्तपणे स्पष्ट करता येईल.

**समारोप :-**

प्रकरण दोनमध्ये आपण नामदेव चं कांबळे यांचे जीवनचरित्र व त्यांच्या वाङ्मयाचा परिचय करुन घेतला त्याचबरोबर त्यांच्या साहित्यप्रकाराची लेखनशैलीची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. नामदेव कांबळेंनी काव्य, कथा, कादंबरी, ललित लेख, अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून लेखन केले आहे. त्यातील त्यांचे काव्यलेखन एकुण जीवनाचे चित्रण करताना मानवाची व्यथा मांडते. मात्र पराकोटीला जाणारा नकार विद्रोह कांबळे मांडत नाहीत. हे त्यांचे वेगळेपण म्हणावे लागेल.

त्यांनी आपल्या कथालेखानातून वास्तव स्वरुपात मानवी जीवनाचे चित्रण घडविले आहे. नामदेव कांबळेंच्या वाङ्मयाचा विचार करता कविता, कथा, एकांकिका, ललित लेखन आदींच्या तुलनेत त्यांचे कादंबरी या वाङ्मयप्रकारात झालेले लेखन वेगळेपण स्पष्ट करते. एक दलित म्हणून वाट्याला आलेल्या

जीवनाला ते संयमी वृत्तीने, आक्रस्ताळेपणाची भूमिका न स्विकारता सामोरे जातात. त्यांच्या कादंबरी लेखनातून समाजजीवनाचा परीघ विस्तृतपणे मांडलेला आहे. त्यांच्या 'राघववेळ' कादंबरीला 'साहित्य अकादमी'चाउ पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराबरोबर त्यांना इतरही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. 'राघववेळ' या कादंबरीत नामदेव चं. कांबळे यांनी मांग समाजात जन्मलेल्या आणि विधवेचं जीवन जगत आपल्या मुलांना घडविणाऱ्या वाटंबीच्या कहाणीबरोबरच भूक सूक्ताचा विचार मांडला आहे. मांग वेटाळाची कहाणी रेखाटतानाच त्याच मांग वेटाळातील रघूच्या विकसीत रुपाचे दर्शन 'उनसावली', 'सांजरंग' मध्ये घडविले आहे. रघूच्या विकसित रुपाबरोबर मांग आणि नवबौध्द समाजातील वैचारिक संघर्ष घडविण्यास कादंबरीकार यशस्वी झाला आहे तसेच या दोन्ही कादंबरी लेखनातून मांग समाजाच्या दु:खाबरोबर शोषण मुक्तीचा झगडा चित्रित होतो. म्हणून पुढील प्रकरणांतून 'उनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास करावयाचा आहे.

'राघववेळ' मध्ये रघूच्या पूर्वमाध्यमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा इतिवृत्तांत रंगविलेला आहे. 'उनसावली' मध्ये रघूचे महाविद्यालयीन जीवनाचे, गावाकडच्या जीवन अनुभवांचे दिग्दर्शन केले आहे. 'साजरंग' मध्ये त्यानंतरच्या म्हणजे रघूला नोकरी लागल्यानंतरचे जीवन चित्रित केले आहे. रघूचे वैवाहिक जीवन तसेच त्याचे भावजीवन आणि वालंबीच्या मृत्यूपर्यंतचे सामाजिक जीवन चित्रण 'साजरंग' मध्ये चित्रित केले आहे. माणूसपनापासून ढळण्याचे अनेक प्रसंग 'राघववेळ', 'उनसावली', 'साजरंग' या तीन भागात येतात. वालंबी, रघू, सिताराम, कौशी ही सर्व माणसासारखी माणसे पण या सर्वांना जीवन जगताना अमानूष प्रसंगांना सामोरे जावे लागते. माणूस म्हणून जगण्याचा त्यांना अटीतटीचा प्रयत्न करावा लागतो. आजच्या समाज व्यवस्थेत शोषितांचा लढा शोषणमुक्तीसाठी चालू आहे. त्यासाठी जो संघर्ष चालू आहे त्या संघर्षाला अंत नाही. हेच या दोन्ही कांदबरीतून लेखकाने समर्थपणे दाखवून दिले आहे. तळहातावर पोट भरणाऱ्या दलितांच्या वाट्याला जीवनभर मुस्कटदाबी, मारहाण कशी सोसावी लागते याचे वास्तव चित्रण 'उनसावली' व 'साजरंग' या दोन कादंबरीतून कसे दोखून दिले आहे हे पुढील तिसऱ्या प्रकरणांत पहावयाचे आहे.

संदर्भ.


१) नामदेव कांबळे, 'स्मरण-विस्मरण', मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, जाने. २०००, पृ.१९४

२) नामदेव कांबळे, 'मोराचे पाय', मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, जाने.१९९७

३) नामदेव कांबळे, 'आस्वाद १' आणि 'आस्वाद २', अक्षरवैदर्भी - सप्टेंबर १९८७, पृ. क्र.२५

४) उ.नि.पृ.२६

५) नामदेव कांबळे - अक्षरवैदर्भी, वर्धापन विशेषांक १९८७, पृ.८७.

६) उ.नि.पृ. ८७

७) नामदेव कांबळे - लोकसत्ता - विदर्भ रंग - दिपावली अंक - २००१, पृ.१३

८) नामदेव कांबळे, 'स्मरण विस्मरण', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, जाने. २०००, पृ.११५

९) उ.नि.पृ.१३७

१०) उ.नि.पृ.१९२

११) नामदेव चं. कांबळेंची घेतलेली मुलाखत.


14363
A